लोकमत

# उल्कावर्षावाची सोमवारपर्यंत पर्वणी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : रात्री साडेआठपासून ते पहाटे साडेपाचपर्यंत मिथुन राशीतून होणारा उल्कावर्षाव सोमवारी (दि. २० डिसेंबर) पर्यंत पाहता येईल, अशी माहिती डॉ. राजीव व्हटकर यांनी मंगळवारी दिली. सर्वात मोठा आणि नेत्रदीपक असा उल्कावर्षाव सोमवारी मध्यरात्रीनंतर पाहण्याची सुवर्णसंधी असल्याने शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राद्वारे विद्यार्थी, नागरिकांसाठी आकाश निरीक्षणाचा कार्यक्रम आयोजित केला. सुरुवातीला ढगाळ वातावरणामुळे आकाश निरीक्षणास अडथळे येत होते. मात्र, रात्री साधारण एकनंतर आकाश निरभ्र होण्यास सुरुवात झाली. तासाला साधारणपणे ६० इतक्या उल्का पडतानाचे निरीक्षण नोंदवण्यात आले.

पुढारी

# फोटोग्राफी विषयावर शिवाजी विद्यापीठात आज कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन आणि व्हिजन आय फोटो व्हिडीओ असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. १५ रोजी फोटोग्राफी या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

मानव्यशास्त्र इमारतीतील अर्थशास्त्र अधिविभागाच्या सेमिनार हॉलमध्ये सकाळी साडेदहा ते दुपारी अडीच वाजेपर्यंत ही कार्यशाळा होईल, अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात कोल्हापूर येथील प्रसिद्ध वाईल्डलाईफ फोटोग्राफर स्वप्निल पवार यांचे 'वाईल्डलाईफ फोटोग्राफीचे तंत्र' या विषयावर सादरीकरण होणार आहे. दुसऱ्या सत्रात कणकवली येथील डॉक्युमेंट्री फोटोग्राफर इंद्रजित खांबे यांचे 'डॉक्युमेंट्री फोटोग्राफी संधी आणि आव्हाने' या विषयावर सादरीकरण होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी फोटोग्राफर असोसिएशनचे उपाध्यक्ष आकाश चव्हाण असतील. फोटोग्राफर तसेच विद्यार्थ्यांनी कोव्हिडच्या नियमांचे तंतोतंत पालन करून कार्यशाळेत उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यशाळेचे सहसंयोजक फोटो जर्नालिस्ट अभिजित गुर्जर यांनी केले आहे.

पुढारी

# मिथुन राशीतून होणारा उल्का वर्षाव २० डिसेंबरपर्यंत पाहता येणार

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

मिथून राशीतून झालेला उल्का वर्षाव खगोलप्रेमींनी अनुभवला. मंगळवारी रात्री साडेआठ ते बुधवारी पहाटे साडेपाचपर्यंत खगोल प्रेमी व अवकाश संशोधकांनी उल्का वर्षावाचा आनंद लुटला. दि २० डिसेंबर पर्यंत पाहता येणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राद्वारे विद्यार्थ्यांसाठी व नागरिकांसाठी आकाश निरीक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

१४ डिसेंबरच्या मध्यरात्री २ वाजता १००ते १२० एवढ्या उल्कांचा वर्षाव मिथुन राशीतून होण्याची शक्यता असल्याने या क्षणाची खगोलप्रेमी आतुरतेने वाट पाहत होते. सुरुवातीला ढगाळ वातावरणामुळे आकाश निरीक्षणास अडथळे येत होते. परंतु रात्री एकनंतर आकाश निरभ्र होण्यास सुरवात झाली. तासाला साधारण पन्नास ते साठ इतक्या उल्का पडतानाचे निरीक्षण नोंदवण्यात आले.हा उल्का वर्षाव साध्या डोळ्यांनी पाहण्याचा आनंद सर्वांनी घेतला. रात्री ८ वाजून ३० मिनिटांपासून ते ते पहाटे ५.३० पर्यंत मिथुन राशीतून होणार उल्का वर्षाव २० डिसेंबर पर्यंत पाहता येईल अशी माहिती डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली आहे.

सकाळ

# बिंदुनामावली तपासणी शिबिर

फुलेवाडी : शासनाच्या निर्णयान्वये अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक प्रवर्गातील शिक्षक भरतीवरील निर्बंध शिथिल झाले. यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या विशेष कक्ष विभागातर्फे जिल्ह्यातील महाविद्यालयांचे बिंदुनामावली तपासणी शिबिर न्यू कॉलेज येथे झाले. शिबिरात २९ महाविद्यालयांना बोलविले होते. त्यापैकी २३ महाविद्यालयांची तपासणी पूर्ण झाली. शिबिराकरिता विशेष कक्ष विभागाचे उपकुलसचिव पी. एस. पांडव, व्ही. एस. सोयम, व्ही. डी. अडगळे यांनी तपासणी पथकाचे प्रमुख म्हणून काम पाहिले. विभागातील इतर सहा. कुलसचिव, अधीक्षक, इतर कर्मचाऱ्यांनी तपासणी शिबिरात सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्रबंधक एम. वाय. कांबळे, लॅब असिस्टंट चेतन पाटोळे यांनी नियोजन केले.

15 DEC 2021 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उल्कावर्षाव पाहा २० डिसेंबरपर्यंत

## पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रात निरीक्षण कार्यक्रम

कोल्हापूर, ता. १४ : मिथून राशीतून होणारा सर्वात मोठा उल्कावर्षाव अनुभवण्याची संधी मिळणार आहे. रोज रात्री ८.३० ते पहाटे ५.३० या कालावधीत २० डिसेंबरपर्यंत उल्का वर्षाव पाहता येईल. शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राद्वारे अवकाश निरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे, अशी माहिती डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

सोमवारी (ता.१३) मध्यरात्रीपासून तासाला साधारण पन्नास ते साठ उल्का पडत होत्या. साध्या डोळ्यांनीही त्या पाहता आल्या. २० डिसेंबरपर्यंत अशी संधी मिळणार आहे. मिथुन राशीतून होणारा उल्कावर्षाव धूमकेतूमुळे नसून ३२०० फेथॉन या लघुग्रहामुळे आहे. हा लघुग्रह मंगळ आणि गुरू ग्रहांच्या कक्षा दरम्यानच्या पट्ट्यातील एक लघुग्रह आहे. त्यापासून धुळीचे कण निर्माण होतात आणि पृथ्वी भ्रमण करते तेव्हा दरवर्षी डिसेंबर महिन्यात मिथुन राशीतून उल्कावर्षाव पाहता येतो. हे धुळीचे कण पृथ्वीच्या वातावरणामध्ये प्रवेश करतात तेंव्हा त्यांचे हवेशी घर्षण होते व ते पेट घेतात. काही मोठ्या उल्का पूर्ण न जळता जमिनीपर्यंत पोहचतात.

15 DEC 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी डॉ. माने समूह समन्वयक

**कोल्हापूर :** केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाकडून आयोजित राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी डॉ. प्रल्हाद माने यांची निवड झाली आहे. संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्य यांनी निवडीबाबतचे पत्र डॉ. माने यांना पाठवले आहे. प. बंगालमधील कोलकाता येथील जाधवपूर विद्यापीठ, कर्नाटकमधील मंगळूर विद्यापीठ, मध्य प्रदेशमधील इंदिरा गांधी केंद्रीय आदिवासी



विद्यापीठ (अमरकंटक), स्वामी विवेकानंद विद्यापीठ (सागर), देवी अहिल्या होळकर विद्यापीठ (इंदोर) आणि उत्तर प्रदेश येथील दयालबाग शिक्षण संस्था (आग्रा) या विद्यापीठांमध्ये आयोजित सोळाव्या युवा संसद स्पर्धेचे समूह समन्वयक व राष्ट्रीय परीक्षक म्हणून काम पाहण्याची जबाबदारी डॉ. माने यांच्याकडे सोपवली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचे ते समन्वयक आहेत. २०१८ मध्ये त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या युवा संसद संघाने राष्ट्रीय स्तरावरील विजेतेपद प्राप्त केले आहे. डॉ. माने यांच्या निवडीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अभिनंदन केले.